नियोजन विभागामध्ये ई-ऑफिस प्रणालीचा
वापर दि. ०१.०४.२०२६ पासून बंधनकारक
करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक - संकीर्ण-२०२३/प्र.क्र. ०७/का.१४२३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ एप्रिल, २०२६

संदर्भ :- (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/ कार्या. र. व का.१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३

(२) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०७/का.१४२३, दिनांक १४ मार्च, २०२३

(३) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/ कार्या. र. व का.१, दिनांक १२ जुलै, २०२४

## परिपत्रक

प्रस्तावना

सामान्य प्रशासन विभागाने मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांत तसेच क्षेत्रीय कार्यालयांमधील शासकीय कामकाजात दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करण्यासाठी संदर्भाधीन क्र.१ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन नियोजन विभाग व विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन क्र.२ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. तथापि, नियोजन विभागात अन्य विभागांकडून येणारे प्रस्ताव अद्यापही काही प्रमाणात ई-ऑफीस द्वारे सादर होत नाहीत. तसेच नियोजन विभागांतर्गत देखील ई-ऑफिसचा प्रभावीपणे वापर होत नाही. सबब, नियोजन विभागामध्ये ई-ऑफीसचा वापर बंधनकारक करण्यात येत आहे.

कृ.मा.प.

परिपत्रक -

सामान्य प्रशासन विभागाने मंत्रालयातील सर्व विभागांमध्ये ई-ऑफिस प्रणालीचा वापर अधिकाधिक व्हावा याकरिता तसेच मंत्रालयातील सर्व विभागांमधील भौतिक नस्त्यांचे (Physical Files) प्रमाण कमी करण्याच्या सूचना सर्व विभागांना निर्गमित केल्या आहेत. त्यास अनुसरुन नियोजन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी ई-ऑफिसचा प्रभावीपणे वापर करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

(१) विभागांतर्गतच्या नस्त्या या ई-फाईल स्वरूपातच असणे बंधनकारक आहे. भौतिक स्वरूपातील नस्त्या (Physical Files) सचिव (नियोजन) कार्यालयात स्वीकारल्या जाणार नाहीत.

(२) आंतर-विभागीय नस्त्यादेखील ई-फाईल स्वरूपात असणे आवश्यक आहे आणि कोणत्याही भौतिक स्वरूपातील नस्त्या पाठविल्या किंवा स्वीकारल्या जाऊ नयेत.

(३) सदरची कार्यवाही करतांना काही अडचणी उद्भवल्यास माहिती तंत्रज्ञान विभागातील ई-ऑफिसशी संबंधित तांत्रिक सहाय्य करणाऱ्या टीमची मदत घ्यावी व ई-ऑफिस प्रणालीचा काटेकोरपणे अवलंब करण्याची कार्यवाही करावी.

(४) ई-ऑफीसचा नियोजन विभागामध्ये १०० टक्के वापर दि. ०१.०४.२०२६ पासून बंधनकारक करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्रद्धा कोचरेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व कक्ष अधिकारी, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित,

१) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
२) सचिव, नियोजन विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) निवड नस्ती, का.१४२३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई